# शिवसेनेची ताकद पाहून गारद झालेल्या पक्षांनी तुणतुणे वाजवू नये!

**संपादकीय**

**सौ. जयश्री खाडिलकर-पांडे सादर करीत आहेत**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे हिंदुहृदयसम्राट तर होतेच, पण त्याहीपेक्षा ते मराठी माणसांचे संरक्षक होते. शिवसेनाप्रमुख आहेत मग मराठी माणसाला कुणी हात लावणार नाही असा पूर्ण शंभर टक्के विश्वास मराठी माणसाला होता आणि म्हणूनच महाराष्ट्रात शिवसेनेचे सामर्थ्य कमी झाले तेव्हाही मुंबईकरांनी शिवसेनेच्या हातातच सत्ता दिली. आपल्यावर जीवावरचे संकट आले तर बाळासाहेबच आपल्याला वाचवतील ही भावना प्रत्येकाच्या मनात ठाम होती. या भावनेमुळेच शिवसेनाप्रमुखांच्या निधनाच्या वृत्ताने संपूर्ण महाराष्ट्र हेलावला. आज सर्व व्यवहार सुरळीत सुरू झाले असले तरी दु:ख काकणभरही कमी झालेले नाही.

अशा या भावनिक अवस्थेत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक कुठे व्हावे या चर्चेला गेले तीन दिवस अक्षरश: ऊत आलेला आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कारानंतर दुसऱ्या दिवशी अस्थी गोळा करून निघतानाच मनोहर जोशी म्हणाले की, शिवसेनाप्रमुखांचे स्मारक शिवतीर्थावर व्हावे. हे वाक्य उच्चारताना त्यातून वादळ निर्माण होईल असे मनोहर जोशींनाही वाटले नसेल. खरे तर सरांनी त्यांच्या कारकीर्दीत वादग्रस्त विधाने कधी फारशी केलीच नाहीत. डोक्यावर बर्फ, तोंडात साखर आणि दुपारची झोप हे मुख्यमंत्री ते लोकसभा सभापती या त्यांच्या यशस्वी प्रवासाचे गमक आहे.

पण मनोहर जोशींनी स्मारकाचा विषय छेडला आणि अक्षरश: मधमाशांसारखे सर्वच पक्ष या विषयातून मध शोषून घेण्यास उतावीळ झाले. हा उतावीळपणा आश्चर्यकारक नव्हता, पण त्याचा वेग धक्कादायक होता. शिवसेनाप्रमुखांच्या अंत्ययात्रेवेळी जी महाप्रचंड गर्दी लोटली होती ती पाहून सर्वच राजकीय पक्ष हादरले होते. अंत्ययात्रेवेळी किती गर्दी होईल याचे प्रत्येक पक्षाने बांधलेले अंदाज त्यांच्या कल्पनेबाहेर चुकीचे ठरले होते. त्या दिवशीचा तो महासागर पाहून एकीकडे सर्व पक्षांच्या छातीत धडकी भरली आणि दुसरीकडे हा महासागर आपल्या पक्षाकडे कसा वळवायचा याची वळवळ प्रत्येक पक्षाच्या मेंदूत सुरू झाली. हा परिणाम होत नाही तोच मनोहर जोशींनी त्यांच्या हातात स्मारकाचा विषय दिला. स्मारक झालेच पाहिजे असे आपण जितक्या जोरात आणि जितक्या ठासून सांगू तितका महासागरावर परिणाम होणार हे जाणून सर्व पक्षांनी चढाओढ करीत धडाधड या विषयात उड्या घेतल्या आणि आपण वरचढ राहायचे या अजेंड्यामुळे राजकीय पक्षांची या विषयावर बाष्कळ बडबड सुरू झाली.

डोळे फिरवत, छाती फुगवत, शब्दांना धार आणण्याचा सतत प्रयत्न करणारे संजय राऊत यांनी अलीकडे जी स्टाईल उचलली आहे त्या स्टाईलमध्ये त्यांनी इशारा दिला की, स्मारक शिवाजी पार्कवरच होईल आणि जे विरोध करतील त्यांची महाराष्ट्रात राहण्याची लायकी नाही. संजय राऊतांच्या इशाऱ्यांचा शिवसैनिकांवर किती परिणाम होतो हे शिवसैनिकच सांगू शकतील.

संजय राऊतांचे वाक्य पूर्ण होत नाही तोवर मनसेचे नगरसेवक संदीप देशपांडे आणि काँग्रेसचे नगरसेवक सुनील मोरे यांनी इंदू मिलमध्ये स्मारक व्हावे असे म्हणून वणवाच पेटविला.

काँग्रेसमध्ये कितीही मोठे गुन्हे केले आणि कितीही मोठा भ्रष्टाचार केला तरी पटकन कारवाई होतच नाही. गुन्हेगाराला वाचवायचा आटापिटा होतो. अगदीच गळ्याशी आले तर राजीनामा घेतला जातो. पण राजीनामा घेतल्यावरही गुन्हेगाराची पाठराखण सुरूच असते. अशा या 'सुसंस्कृत' पक्षाने आपल्या या नगरसेवकाला मात्र एका दिवसात पक्षातून कारणे दाखवा नोटीस दिली. महायात्रेतील प्रचंड गर्दीची ताकद पाहिल्याचा काँग्रेसवर जो परिणाम झाला आहे त्यातून हा निर्णय झाला आहे. नाहीतर काँग्रेस संस्कृतीत अशी तडकाफडकी नोटीस काढण्याची पद्धत नाही.

मनसेने तर कमालच केली. मनसेच्या नगरसेवकाने बाळासाहेबांच्या स्मारकासाठी इंदू मिलची जागा मागितल्याने वणवा पेटला तेव्हा मनसे शांत राहिला. हा नगरसेवक प्रत्येक वाहिनीवर आपले म्हणणे मांडत होता तेव्हा पक्ष शांत राहिला. मुळात महाराष्ट्राला भेडसावणाऱ्या अनेक समस्यांवर हा पक्ष हल्ली शांतच असतो. एखाद्या समस्येवर एखाद्या पत्रकाराने प्रतिक्रिया विचारलीच तर 'हड्रे' अशा शब्दांत त्याला हिणवले जाते. समस्या निर्माण झाल्यानंतर महिनाभराने त्यावर बोलणाऱ्या या पक्षानेही स्मारकाबाबत घाई केली. का? तेच कारण असावे. त्यातून आपल्या नगरसेवकाने दोन दिवस वणवा पेटविल्यानंतर तिसऱ्या दिवशी आपण तोंडघशी पडत आहोत हे लक्षात येताच 'हा आमच्यातला नाही ' असे काँग्रेस टाईप पत्रक काढून मनसेने हात धुतले. संदीप देशपांडेने पालिकेतील अनेक भ्रष्टाचार उघड केले, पण आता पक्षाने साथ सोडल्यावर त्याला तोंड लपवत फिरावे लागेल.

काँग्रेसच्या आणि राष्ट्रवादीच्या सर्व नेहमीच्या नेत्यांनी, प्रवक्त्यांनी स्मारकाबाबत वक्तव्य केले. इंदू मिलची जागा आंबेडकरांच्या स्मारकासाठी देण्याची अद्याप काँग्रेसला अधिकृत कायदेशीर घोषणा करता आलेली नाही. पण ही जागा जणू दिलीच आहे अशा थाटात वक्तव्य करीत शिवसेनाप्रमुखांचेही भव्य स्मारक झाले पाहिजे हे प्रत्येकाने अगदी पुन्हा पुन्हा सांगितले. रत्नाकर महाजन, भाई जगताप, आर. आर. पाटील, नितीन राऊत, वर्षा गायकवाड अशी खूप मोठी यादी आहे.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या महायात्रेतील तुफानी ताकद पाहून सर्व पक्षांनी गेले दोन दिवस उतावीळ होऊन अगदी वाट्टेल त्या पातळीपर्यंत जाणारी बाष्कळ बडबड केली. आता हे उसने आणलेले तुणतुणे सर्वांनी थांबवावे ही महाराष्ट्राच्या जनतेची विनंती आहे.

शिवसेनाप्रमुखांचे स्मारक कुठे व्हावे याची अधिकृत घोषणा करण्याचा मान त्यांनीच उद्धव ठाकरे यांना दिला आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी त्यांची भूमिका स्वत: मांडल्यावरच पुढे चर्चा होऊ शकते.

दुसरी आणि महत्त्वाची बाब म्हणजे महायात्रेत लोटलेला महासागर अशा उतावीळ घोषणांनी आपल्याकडे वळेल असे राजकीय पक्षांनी क्षणभरही मानू नये. महायात्रेत लोटलेला महासागर हा अत्यंत विचारी आहे. शिवसेनाप्रमुखांनी ४० वर्षे जे कार्य केले ते आपल्यासाठी केले, आपल्या संरक्षणासाठी केले अशी मनापासून दृढ भावना होती म्हणून हा महासागर स्वत:हून त्या दिवशी आपल्या नेत्याच्या शेवटच्या यात्रेत त्याच्या मागून चालला. जनतेसाठी कार्य केल्याशिवाय जनता असा सन्मान देत नाही. त्या दिवशी लोटलेला महासागर कुणी आणलेला लोंढा नव्हता. तो महासागर स्वत: उसळला होता. आपल्या संरक्षणकर्त्याने परत यावे म्हणून 'परत या', 'परत या' असा टाहो फोडत होता. हा सुज्ञ, विचारी महासागर आहे. त्यासाठी कणभरही निस्वार्थ सेवा केली तर तो भरभरून प्रेम देतो. महायात्रेतील महासागर आपल्याकडे वळवायचा असेल तर ही उतावीळ बडबड थांबवा आणि जनतेला त्यांच्या रोजच्या जीवघेण्या संकटातून दिलासा मिळेल असे निर्णय घ्या. शिवसेनाप्रमुखांना हीच खरी श्रद्धांजली ठरेल आणि यातूनच एकमताने अतिभव्य दिमाखदार स्मारकही उभे राहील.